# मिरा भाईंदर महानगरपालिका

## "मा. विभागीय पदोन्नती निवड समिती" बैठक दि.02/06/2025 रोजीचे इतिवृत्तांत"

## निवड सुची वर्ष - 01 सप्टेंबर 2024 ते 31 ऑगस्ट 2025

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) (वेतनश्रेणी S-15, 41800-132300) या संवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास उप मुख्य अग्निशमन अधिकारी (गट-ब) (वेतनश्रेणी S-16 44900-142400) या संवर्गातील पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.02/06/2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्यालय, दुसरा मजला येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. श्री. राधाबिनोद अरिबम शर्मा, भा.प्र.से. | आयुक्त तथा अध्यक्ष |
| 2. श्रीम. कल्पिता पिंपळे | उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव |
| 3. श्री. सुधीर नाकाडी | मुख्यलेखापरिक्षक तथा सदस्य |
| 4. श्री दिपक खांबीत | प्रभारी शहर अभियंता तथा मागासवर्गीय प्रतिनिधी |

| | | | |
|---|---|---|---|
| (कल्पिता पिंपळे) | (दिपक खांबीत) | (सुधीर नाकाडी) | (राधाबिनोद अरिबम शर्मा, भा.प्र.से.) |
| उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव | प्रभारी शहर अभियंता तथा मागासवर्गीय प्रतिनिधी | मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य | आयुक्त तथा अध्यक्ष |
| विभागीय पदोन्नती निवड समिती | विभागीय पदोन्नती निवड समिती | विभागीय पदोन्नती निवड समिती | विभागीय पदोन्नती निवड समिती |

आस्थापना विभागाने सादर केलेला प्रस्ताव -

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमाक मिभम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28 मे, 2019 व शासन निर्णय क्रमांक मिभाम-1123/प्र.क्र.22/नवि-28, दि.07/06/2023 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 नुसार उप मुख्य अग्निशमन अधिकारी (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्वत व टक्केवारी<br>1. नामनिर्देशन<br>2. पदोन्नती<br>3. प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| श्रेणी-2<br>अग्निशमन<br>सेवा | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील 'अग्निशमन केंद्र अधिकारी' या पदावर किमान 03 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या किंवा 'सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी' या पदावर किमान 10 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या **(यापूर्वी लगतच्या 2 वर्षात 'अग्निशमन केंद्र अधिकारी' या पदावर पदोन्नती दिली असल्यास मागील सेवा विचारात घेऊन)** व राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील पदवी (B.E. Fire).<br>किंवा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | राष्ट्रीय अग्निशमनसेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील Divisional Fire Officer पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका)<br>किंवा<br>The Istitution of Fire Engineers (U.K) किंवा (India) या संस्थेकडील सदस्यत्व (M.I.Fire)<br>किंवा<br>कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Istitution of Fire Engineers (U.K) यांचे सदस्यत्व प्राप्त केलेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत आकृतीबंधानुसार उप मुख्य अग्निशमन अधिकारी या संवर्गातील 01 पद मंजूर आहे व मिरा भाईदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 नुसार उप मुख्य अग्निशमन अधिकारी (गट-ब) चे 01 पद 100% पदोन्नतीने भरावयाचे आहे. तथापि उप मुख्य अग्निशमन अधिकारी (गट-ब) रिक्त असलेल्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याचे प्रस्तावित आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमाक एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि 01 ऑगस्ट 2019 नुसार शासकीय अधिकारी कर्मचारी याना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र उ(3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्याची अ.क्र i) ते Xii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे

सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमाक बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-व, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यानी याचिका क.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने

भरण्यात यावी असे निर्देश आहेत तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग सहाराष्ट्र शासन याचेकडील पत्र क दिव्यांग 2015/प्र. क्र 171/16-अ. दि 23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनानी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

## परिशिष्ट "अ"

| अ.क्र. | ज्येष्ठतेनुसार विचार क्षेत्रात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची जाती प्रवर्ग | ज्येष्ठतेनुसार विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय कर्मचाऱ्यांची नावे | ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्रमांक | जन्म दिनांक व सध्याचे वय | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त आहे/नाही | ज्या पदावरुन पुढील पदावर पदोन्नती देय आहे त्या पदावर एकुण सेवा किती व केव्हापासून | सध्याच्या पदावर जेव्हापासून सलग काम करीत आहे तो दिनांक (त्या पदाचे नाव द्यावे) पदोन्नतीचा मानीव दिनांक दिला असल्यास तो नमूद करावा | वयाच्या 50/55 व्या वर्षी झालेल्या पुनर्विलोकनाचा निर्णय | जातीचे प्रमाणपत्राची वैधता प्राप्त झाली आहे किंवा कसे? | शिस्तभंग विषयक कार्यवाही/प्राथमिक चौकशी चालू आहे/नाही (विस्तृत माहिती जोडपत्र क मध्ये नमूद करावी) | पूर्वी कधीतरी आस्थापना मंडळाने त्यांचा विचार केला होता/नाही असल्यास आ.मं.च्या बैठकीचा दिनांक व सा.प्र.वि.चा संबंधीत पत्रव्यवहार नमूद करावा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1. | खुला | श्री. धनंजय कनोजे | 2 | 22/07/1983 | 31/07/2041 | बी.कॉम. स्टेशन ऑफिसर अँन्ड इन्स्ट्रक्टर प्रशिक्षण | नाही | 26/04/2022 पासुन (3 वर्षे) | 26/04/2022 पासुन (अग्निशमन केंद्र अधिकारी) | लागू नाही | लागू नाही | सोबत जोडपत्र-क जोडले आहे. | - |
| 2. | खुला | श्री. प्रकाश बोराडे | 3 | 01/06/1969 | 31/05/2027 | बी.कॉम, एम.कॉम, सॅनिटरी इन्स्पेक्टर डिप्लोमा, इंग्रजी व मराठी | आहे | 26/04/2022 पासुन (3 वर्षे) | 26/04/2022 पासुन (अग्निशमन केंद्र अधिकारी) | होय | लागू नाही | नाही. | - |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | टंकलेखन 40 श.प्र.मि, हिंदी टंकलेखन 30 श.प्र.मि, राज्य अग्निशमन प्रशिक्षण अभ्यासक्रम, फायर इंजिनिअरींग ग्रॅज्युएटशीप (फायर) (IFE-India) एम आय फायर इंजिनिअरींग परीक्षा (IFE-UK) | | | | | | | |

- विचारक्षेत्रातील खालील मागासवर्गीय अधिकाऱ्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | जात पडताळणी आहे / नाही |
|---|---|---|
| 1. | श्री.प्रकाश बोराडे | आहे |

- विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांपैकी खालील कर्मचारी यांचे वयाच्या 50/55 व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. प्रकाश बोराडे |

- विचारक्षेत्रातील खालील अधिकाऱ्यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. धनंजय कनोजे |
| 2. | श्री. प्रकाश बोराडे |

➢ विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे लागु नाही.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. धनंजय कनोजे |
| 2. | श्री. प्रकाश बोराडे |

➢ विचारक्षेत्रातील खालील अग्निशमन केंद्र अधिकारी यांचा जा.क्र.मनपा/आस्था/3763/2021-22, दि.29/03/2022 अन्वये परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यात आला आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. धनंजय कनोजे |
| 2. | श्री. प्रकाश बोराडे |

➢ विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु असल्याबाबत माहिती खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | विभागीय चौकशीबाबत माहिती |
|---|---|---|
| 1. | श्री.धनंजय कनोजे | श्री.धनंजय कनोजे, अग्निशमन केंद्र अधिकारी यांनी दिवाळी सणामध्ये फटाक्यांच्या स्टॉलसाठी ना हरकत दाखल देण्याकरीता स्टॉल धारकांकडून आर्थिक रक्कम स्विकारुन त्यांना नाहरकत दाखल दिल्याची तक्रार प्राप्त झाल्याने सदर प्रकरणाची विभागीय चौकशी करणेकामी ज्ञापन व दोषारोप पत्र बजाविण्यात आले असुन सदर दोषारोप पत्रातील आरोप त्यांनी अमान्य केल्याने त्यांचे विरुध्द चौकशी अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असून विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. |

➢ विचारक्षेत्रात असलेल्या खालील अधिकारी हे दिव्यांग अधिकारी नाहीत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. धनंजय कनोजे |
| 2. | श्री. प्रकाश बोराडे |

➢ विचारक्षेत्रातील खालील अधिकारी जा.क्र.मनपा/आस्था/3760/2021-22, दि.29/03/2021 अन्वये स्थायित्व प्रमाणपत्र दिलेले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. धनंजय कनोजे |
| 2. | श्री. प्रकाश बोराडे |

➢ विचारक्षेत्रातील खालील अग्निशमन केंद्र अधिकारी यांना जा.क्र.मनपा/आस्था/1162/2021-22, दि.24/08/2021 अन्वये मराठी एदर्थ मंडळाची भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात आली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. धनंजय कनोजे |
| 2. | श्री. प्रकाश बोराडे |

➢ विचारक्षेत्रातील खालील अग्निशमन केंद्र अधिकारी यांना जा.क्र.मनपा/आस्था/1088/2021-22, दि.11/08/2021 व जा.क्र.मनपा/आस्था/1089/2021-22, दि.11/08/2021 अन्वये हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात आली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. धनंजय कनोजे |
| 2. | श्री. प्रकाश बोराडे |

➢ विचारक्षेत्रातील खालील अग्निशमन केंद्र अधिकारी संवर्गाची सन 2023 च्या अंतिम जेष्ठता यादीनुसार जेष्ठता क्रम खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जेष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|---|
| 1. | 2 | श्री. धनंजय कनोजे |
| 2. | 3 | श्री. प्रकाश बोराडे |

➢ श्री.धनंजय कनोजे, अग्निशमन केंद्र अधिकारी यांनी उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाकरीता आवश्यक अर्हता सद्यस्थितीत धारण केलेली नाही तसेच श्री.धनंजय कनोजे, अग्निशमन केंद्र अधिकारी यांनी दिवाळी सणामध्ये फटाक्यांच्या स्टॉलसाठी ना हरकत दाखल देण्याकरीता स्टॉल धारकांकडून आर्थिक रक्कम स्विकारुन त्यांना नाहरकत दाखल दिल्याची तक्रार प्राप्त झाल्याने सदर प्रकरणाची विभागीय चौकशी करणेकामी ज्ञापन व दोषारोप पत्र बजाविण्यात आले असुन सदर दोषारोप पत्रातील आरोप त्यांनी अमान्य केल्याने त्यांचे विरुध्द चौकशी अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असून विभागीय चौकशी सुरु केलेली असल्याने श्री.धनंजय कोनोजे, अग्निशमन केंद्र अधिकारी यांचा उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर पदोन्नती करीता सद्यस्थितीत विचार करता येणार नाही.

➢ त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उप मुख्य अग्निशमन अधिकारी या संवर्गाचे 01 रिक्त पद पदोन्नतीने भरावयाची असल्यामुळे खालील अग्निशमन केंद्र अधिकारी यांना उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासाठी उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाची शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केलेली आहे. त्यामुळे रिक्त 01 पदावर खालील अग्निशमन केंद्र अधिकारी यांना मा.प्रशासकीय सभेच्या व मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहुन उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देणेस शिफारस आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. प्रकाश बोराडे |

**विभागीय पदोन्नती निवड समितीचा निर्णय :-**

सदर प्रस्तावाचे वाचन करून समितीने खातील अटीशर्तीच्या अधिन राहुन खालील कर्मचारी यांना उप मुख्य अग्निशमन अधिकारी (गट-ब) या पदावर पदोन्नती देणेकरीता निर्णय घेण्यात आला.

1. श्री.धनंजय कोनोजे, अग्निशमन केंद्र अधिकारी यांनी उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाकरीता आवश्यक अर्हता सद्यस्थितीत धारण केलेली नाही तसेच श्री.धनंजय कनोजे, अग्निशमन केंद्र अधिकारी यांनी दिवाळी सणामध्ये फटाक्यांच्या स्टॉलसाठी ना हरकत दाखल देण्याकरीता स्टॉल धारकांकडून आर्थिक रक्कम स्विकारुन त्यांना नाहरकत दाखल दिल्याची तक्रार प्राप्त झाल्याने सदर प्रकरणाची विभागीय चौकशी करणेकामी ज्ञापन व दोषारोप पत्र बजाविण्यात आले असुन सदर दोषारोप पत्रातील आरोप त्यांनी अमान्य केल्याने त्यांचे विरुध्द चौकशी अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असून विभागीय चौकशी सुरु केलेली असल्याने श्री.धनंजय कोनोजे, अग्निशमन केंद्र अधिकारी यांचा उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर पदोन्नती करीता सद्यस्थितीत विचार करता येणार नाही.
2. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उप मुख्य अग्निशमन अधिकारी या संवर्गाचे 01 रिक्त पद पदोन्नतीने भरावयाची असल्यामुळे खालील अग्निशमन केंद्र अधिकारी यांना उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासाठी उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाची शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केलेली आहे. त्यामुळे रिक्त 01 पदावर खालील अग्निशमन केंद्र अधिकारी यांना मा.प्रशासकीय सभेच्या व मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहुन उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देणेकरीता निवड करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. प्रकाश शंकर बोराडे |

3. सदरची पदोन्नती मा.प्रशासकीय सभेच्या मान्यतेच्य अधिन राहून देण्यात येत आहे.
4. वरील अधिकाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे पडताळणीच्या तसेच सेवा व वेतन पडताळणीच्या अधिन राहून लाभ मंजुर करण्यात येत आहे. वेतन निश्चितीनंतर वेतन पडताळणी पथकाडून त्यांची पडताळणी करुन घेणेत यावी.

5. वरील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीच्या अटीशर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे.
6. कोणत्याही मा.न्यायालयाचा निर्णय संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेवर बंधनकारक राहील.
7. वरील अधिकाऱ्यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत समिती शिफारस करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| (कल्पिता पिंपळे) | (दिपक खांबीत) | (सुधीर नाकाडी) | (राधाबिनोद अरिबम शर्मा, भा.प्र.से.) |
| उपायुक्त (मुख्यालय) तथा | प्रभारी शहर अभियंता तथा | मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य | आयुक्त तथा अध्यक्ष |
| सदस्य सचिव | मागासवर्गीय प्रतिनिधी | विभागीय पदोन्नती निवड समिती | विभागीय पदोन्नती निवड समिती |
| विभागीय पदोन्नती निवड समिती | विभागीय पदोन्नती निवड समिती | | |